**महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग**

**अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ,कोल्हापूर**

**यांत्रिकी विभाग, कृष्णानगर-सातारा.**

# निविदा सूचना क्रमांक. ०७ सन २०१४ – १५

**कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सातारा हे खाली दिलेल्या कामासाठी मूळ उत्पादक, त्यांचे अधिकृत प्रतिनिधी किंवा ज्यांना अशा प्रकारच्या कामाचा अनुभव आहे अशा यांत्रिकी संघटनेकडील नोंदणीकृत कर्मशाळा धारकांकडून (कंत्राटदार नोंदणी वर्ग ई अथवा त्यावरील) खाली नमूद केलेल्या कामासाठी ब-१ नमुन्यामध्ये मोहरबंद निविदा मागवित आहेत. को-या निविदेचा नमुना कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सातारा यांच्या कार्यालयामध्ये खालील तक्त्यातील रकाना क्र.९ मध्ये नमूद केलेल्या कालावधीत कार्यालयीन वेळेत (११.०० ते १६.००) सुट्टीचे दिवस वगळून उपलब्ध करून देण्यात येईल व मोहरबंद निविदा कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयामध्येच खालील तक्त्यातील रकाना क्र.१० मध्ये नमूद केलेल्या तारखेपर्यंत स्विकारल्या जातील आणि शक्यतो त्याच दिवशी उपस्थित पुरवठादारांसमक्ष उघडण्यात येतील.**

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत रुपये | बयाणा रक्कम रुपये | सुरक्षित ठेव रुपये | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | कंत्राटदार वर्ग | को-या निविदा नमुन्याची किंमत रुपये | को-या निविदा मिळण्याचा कालावधी | भरुन दिलेल्यानिविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | टेंभू उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत टप्पा क्र ३ अ ते घानंद तलाव कालव्यावरील सा. क्र. १६/५२० मध्ये मुख्य नियंत्रक उभे उचल द्वार आकार ०.९ X १.५ मीटर व त्याच्या परिचलनासाठी ५ टनी क्षमतेचा स्क्रू स्टेम उच्चालक व त्याचे अवगुंठींत भाग यांची निर्मीती व उभारणी करणे. (माल, मजूरी व वाहतुकीसह) | ४,८१,५२४/- | ४,९००/- | रु.१२,१००/- ( रोख २.५ टक्के ) रु.१२,१००/- (देयकातून २.५टक्के) | ६० दिवस | ई वर्ग | रू.५००/- हस्ते किंवा रू.५५०/- पोस्टाने | २५/०८/२०१४ पासून ०१/०९/२०१४ (१६.००) पर्यंत | दि.०५/०९/२०१४ (दुपारी १६.००पर्यंत) |
| २ | टेरेक्स ७२-२१ व्हील लोडर क्र २७०२ साठी रेडीएटर कोअर बदलने व खराब सुट्टे भाग काढून नवीन बसवणे. (माल व मजूरीसह) | ८०,३८८/- | १,०००/- | रु.४,९००/- ( रोख २.५ टक्के ) रु.४,९००/- (देयकातून २.५टक्के) | ३० दिवस | ई वर्ग | रू.५००/- हस्ते किंवा रू.५५०/- पोस्टाने | २५/०८/२०१४ पासून ०१/०९/२०१४ (१६.००) पर्यंत | दि.०५/०९/२०१४ (दुपारी १६.००पर्यंत) |

कृपया नोंद घ्या-

१) सविस्तर निविदा सूचना कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सातारा यांचे कार्यालयमधील नोटीस बोर्डावर लावण्यात आली आहे. विनंती केल्यास कार्यकारी अभियंतांकडून निविदा सूचना प्रत विनामूल्य मिळू शकेल. सदरची निविदा सूचना वेबसाईटवर (www.mahayantriki.com.) पाहवयास मिळेल.

२) को-या निविदा अर्जाची किंमत रोखीने किंवा मनिऑर्डर व्दारेच स्विकारण्यात येईल. चेक, डिमांड ड्राफ्ट किंवा पोस्टल ऑर्डर्स स्विकारल्या जाणार नाहीत.

३) शासन निर्णयानुसार यांत्रिकी कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र तसेच शॉप ॲक्ट/सेल्स टॅक्स/एस.एस.आय. इ. नोंदणी प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

४) पोस्टाने पाठविलेली निविदा वेळेत मिळाली नाही अथवा गहाळ झाली तर, त्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही. मोहरबंद लिफाफा देवाण-घेवाण करण्यात खराब झाल्यास किंवा निविदा संच मिळण्यास कोणताही विलंब झाल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही.

५) एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

**६)** कामाची निविदा व आवश्यक कागदपत्रे दोन स्वतंत्र लिफाफ्यामध्ये भरुन, सदर दोन्ही लिफाफे पुन्हा एका लिफाफ्यात सिलबंद करून सादर करावयाचे आहेत.

**( प्र.बा.भोसले )**

**कार्यकारी अभियंता,**

**यांत्रिकी विभाग,सातारा.**